# सेवक वार्ता

फेब्रुवारी-२०२३

वर्ष -५, अंक-४

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६

## सेवक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा सपन्न

दि. २८ जानेवारी रोजी धुळे येथे सेवक संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. धुळे येथे झालेल्या सन २०२२-२३च्या सर्व साधारण सभेत रसीलाबेन वाढेर यांना श्री. ऋषिकेश रंजन, मुख्य वनसंरक्षक, नाशिक वन वृत्त, श्री. विश्वास सावरकर, माजी संचालक, भारतीय वन्यजीव संस्था, देहरादून आणि सध्या राष्ट्रीय वन्यजीव मंडळाचे सदस्य आणि सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र, पुणेचे सांप्रत अध्यक्ष यांच्या हस्ते सन्मान पत्र देऊन गौरवित करण्यात आले. श्रीं एस.के. गवळी, पुढाकाराने हा कार्यक्रम धुळे येथे झाला. त्या कामी संघाचे कार्यकारी अध्यक्ष श्री. मदन कुलकर्णी, डॉ. एस.एच. पाटील, श्री. विठ्ठल पत्की, विश्वस्त वइतर मान्यवरांचे सहकार्य व पाठबळ मिळाले .

सभेत सेवक वार्ता जानेवारी-२४ च्या वर्धापन दिन विशेषांकाचे श्री. ऋषिकेश रंजन, मुख्य वन संरक्षक, नाशिक , यांच्या हस्ते प्रकाशन झाले. विषय वाटप केलेल्या सदस्यांनी २९ तारखेला अभ्यासक्रम सुधारणा कामाबाबत झालेल्या प्रगती संदर्भात सादरीकरण व चर्चा आयोजित करण्यात आली.


























सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र
पुणे
સન્માન પત્ર
(વી.બી. સાવરકર)
સેવા નિવૃત્ત વન કર્મચારી સંઘ, મહારાષ્ટ્ર, પુણે

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र
पुणे
सन्मान पत्र
(व्ही. बी. सावरकर)
अध्यक्ष
सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र, पुणे




सभेला ४० सभासद हजर होते व खालीलप्रमाणे अजेंड्यावर कामकाज झाले.

१) सभासद नोंदणी.

२) उपस्थितांचे स्वागत, सभा अध्यक्षांची निवड व पदस्थापना.

३) गत वर्षातील दिवंगत सदस्यांना श्रध्दांजली.

४) सेवक संघाचे अध्यक्ष यांचे स्वागतपर भाषण.

५) उपस्थितांचा परीचय.

६) पंचवीसाव्या वार्षिक सर्वसाधाराण सभेचे वृत्तांत वाचन व त्यास मंजुरी.

७) सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचा लेखा परीक्षण अहवालाचे वाचन व त्यास मंजुरी देणे.

८) गत अहवाल वर्षातील झालेल्या कामांचा आढावा आणि पुढील वर्षातील कामाचा मागोवा.

९) गत अहवाल वर्षात शाखानिहाय झालेल्या कामांचा आढावा आणि पुढील वर्षातील कामाचे नियोजन

१०) संघाचे सभासद मासीक वर्गणी रु २०० /- वरुन कमीतकमी ५००/- व अजिवन सभासद शुल्क रु २०००/- वरुन ३०००/- करणे बाबत.

११) ७५ वर्षे वरील सभासद यांना सभेसाठी किंवा संघाचे कार्यक्रमास निमंत्रित केल्यास सर्वसाधारण पुणे ५००/- प्रवास भत्ता देणे बाबत.

१२) माधव गोगटे स्मृतीदिन कार्यक्रमाचे निमंत्रीत व्यक्तीस मानधन ८०००/- करणे बाबत

१३) चंद्रपूर, औरंगाबाद, नाशिक शाखा सक्षम करण्यासाठी उपाययोजना.

**१४)श्रीमती रशीला वाढेर, वनक्षेत्रपाल गुजरात यांचा वन्यप्राणी बचाव कार्याबद्दल सत्कार व त्यांचे मनोगत**
**१५)सभाध्यक्षांचे अनुमतीने आयत्या वेळेचे विषय.**
**श्री. बाजीराव छल्लारे सदस्यांचे किर्तन झाले.**









**२८ जानेवारी २०२४ रोजी हॉटेल सरगम धुळे येथे झालेल्या सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र पुणे यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त**

सेवानिवृत्त कर्मचारी संघाची (सेवक संघ) दिनांक २८ जानेवारी २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षस्थान श्री. विश्वास सावरकर, अध्यक्ष, सेवक संघ यांनी भूषविले. सभेस प्रमुख पाहुणे म्हणून श्री. ऋषिकेश रंजन, मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक) धुळे उपस्थित होते. सभेस उपस्थित व्यक्तींचा तपशील सोबत जोडलेल्या यादीमध्ये दिलेला आहे. सभेच्या सुरुवातीस सर्व उपस्थित त्यांचे स्वागत श्री. संभाजी गवळी, अध्यक्ष, सेवक संघ, धुळे कार्यरिणी यांनी पुष्पगुच्छ देऊन केले. दीप प्रज्वलनानंतर कार्यक्रम हा सुरुवात झाली. सर्व उपस्थितांनी स्वत:ची ओळख करून दिली.

गेल्या वर्षभरामध्ये सेवक संघाचे काही सदस्य निवर्तले सभेस सुरुवात करण्यापूर्वी दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली .

वनरक्षक भरती प्रक्रिया सुरू असल्यामुळे प्रमुख पाहुणे श्री. ऋषिकेश रंजन, यांनी आपले मनोगत व्यक्त करून रजा घेतली. त्यांनी आपल्या भाषणात सेवक संघातर्फे घेण्यात येणाऱ्या कामाची प्रशंसा केली. सद्य परिस्थितीत पाण्याची समस्या विचारात घेता जलसंवर्धन व व्यवस्थापनाचे कामाचे महत्त्व विशद करून सेवक संघास याबाबत प्राधान्याने काम करावयाचे आव्हान केले.

**१. श्रीमती रशीला वाढेर वनक्षेत्रपाल, गुजरात राज्य, यांचा सत्कार**

श्रीमती रशीला वाढेर वनक्षेत्रपाल, यांनी गीर येथील राष्ट्रीय उद्यानात व त्याच्या परिसरात वन्यप्राणी बचाव कार्यामध्ये मोलाची कामगिरी बजावली आहे. श्रीमती रसीलाबेन वाढेर, रेंज फॉरेस्ट ऑफिसर, वेरावळ, सामाजिक वनीकरण विभाग, सोमनाथ गिर विभाग, यांनी ११०० हून अधिक वन्यजीव बचाव कार्यात, ज्यामध्ये २५० हून अधिक सिंह, ५५० बिबटे आणि मगर, अजगर, साप यांसारखे इतर वन्य प्राणी जे चुकून शहराच्या परिसरात/ गावात/ शेतीच्या परिसरात घुसले, विहिरीत पडले किंवा अडकले होते ,त्या प्राण्यांची सुटका करून जंगलात सोडले. विशेषत: सासन गिर राष्ट्रीय उद्यान आणि अभयारण्याच्या लगत असलेल्या गावांमध्ये मानव-वन्यजीव संघर्षाच्या अनेक घटना त्यांनी आश्चर्यकारकपणे आणि धैर्याने सोडवल्या आहेत. रसीलाबेन यांनी आशिया खंडातील सिंहांचे एकमेव आश्रयस्थान असलेल्या सासन गीर नॅशनल पार्क आणि वन्यजीव अभयारण्यात वन्य प्राण्यांपासून जीवाला हल्ल्याचा धोका, झुनोटिक रोगाची लागण होण्याची भीती, प्रतिकूल हवामान आणि सतत दिवस-रात्र संरक्षणासाठी धावपळ, यासह पुरूष सदस्यांमधील विवाहित महिला कर्मचारी सदस्यांसाठी रात्रीची गस्त आणि इतर अनेक विपरीत गोष्टी असूनही शौर्य आणि निष्ठेने पूरक उपक्रम राबवले, जसे कर्मचारी प्रशिक्षण, वन्य प्राण्यांचे पुनर्वसन व्यवस्थापन वगैरे. या त्यांच्या कामगिरीबाबत भारताच्या माननीय राष्ट्रपती यांच्याकडे अलीकडेच सत्कार करण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेत श्रीमती वाढेर यांना सेवक संघाकडून आमंत्रण देण्यात आले होते. श्रीमती वाढेर यांनी सदर आमंत्रण स्वीकारून सभेसाठी उपस्थित राहिल्या. त्यावेळी त्यांनी वन्यजीव संरक्षण आणि त्याबाबतचे बचाव कार्यामध्ये त्यांना आलेले अनुभव कथन केले. त्यांच्या या उत्कृष्ट कार्यगिरीबाबत सेवक संघातर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.

**२.सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालाचे वाचन व मंजुरी**

श्री उमेश धोपेश्वरकर, कोषाध्यक्ष, सेवक संघ यांनी सन २०२२-२३ च्या आर्थिक वर्षाचा लेखा परीक्षण अहवालाचे वाचन केले. त्यास उपस्थित सदस्यांनी एकमताने मंजुरी दिली.

**३. गतवर्षी अहवालाच्या वर्षात झालेल्या कामाचा आढावा आणि पुढील वर्षातील कामाचा मागोवा**

**३.१ प्रशिक्षणार्थींना सुवर्णपदक देणे**

मागील वर्षाच्या सभेत सर्वश्री मदन कुलकर्णी, विवरेकर व बळवंत सेलूकर यांची एक समिती नेमून सेवक संघातर्फे चंद्रपूर व कुंडल येथील वनक्षेत्र प्रशिक्षणामध्ये सर्वप्रथम येणाऱ्या प्रशिक्षणार्थींना सुवर्णपदक देण्याबाबत अहवाल देण्यास सांगितले होते. याबाबत श्री. कुलकर्णी यांनी सदर समितीने आपल्या अहवालात वनक्षेत्र प्रशिक्षणार्थी ऐवजी राज्यातील सर्व वनरक्षक प्रशिक्षण संस्थेत प्रथम येणाऱ्या वनरक्षकांना सुवर्णपदक देण्याची शिफारस केल्याचे सांगितले. यावर सविस्तर चर्चा झाली आणि त्याबाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्याची ठरले

**अ.**चंद्रपूर व कुंडल येथील वनक्षेत्र प्रशिक्षण प्रबोधिनी मधील सर्वप्रथम येणाऱ्या वनक्षेत्रपालांना तो कोणत्याही राज्याचा असेल तरी सुवर्णपदक व प्रशस्तीपत्र सेवक संघातर्फे देण्यात यावे .

**ब.** या प्रबोधिनी मध्ये महाराष्ट्राचे प्रशिक्षणार्थी असल्यास महाराष्ट्रीयन प्रशिक्षणार्थींना वेगळे एक सुवर्णपदक व प्रशस्तीपत्रक सेवक संघातर्फे देण्यात यावे.

**क.** अशा सुवर्णपदकाचा व प्रशस्तीपत्राचा नमुना तयार करण्यात यावा.

**ड.** श्री.पत्की यांनी या प्रबोधिनीमध्ये जे वनपालांचे एक महिन्याचे प्रशिक्षण घेतले जात आहे, त्यामध्ये सर्वप्रथम येणाऱ्या वनपालास सुवर्णपदक देण्याचे सुचविले. श्री. संजय जगताप यांनी सदर एक महिन्याचे प्रशिक्षणाची परीक्षा पद्धत विचारात घेता, त्याद्वारे सुवर्णपदक देणे उचित राहणार नाही असे मत प्रदर्शित केले.

**३.२.सेवक वार्ता अंकांचे संकलन**

सेवक संघाच्या कामकाजाची माहिती दरमहा सेवक वार्तामधून देण्यात येते. अशा अंकाचे संकलन करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिल्यास सेवक संघाच्या कामाप्रती त्यांना माहिती मिळू शकेल व सेवक संघास वन विभागाकडून कामे मिळण्यास मदत होईल अशी शक्यता श्री. गवळी यांनी मांडली. त्यास सर्व उपस्थित त्यांनी मान्यता देऊन मागील दोन वर्षाचे सेवक वार्ता अंकांचे संकलन करून १०० प्रती तयार कराव्यात आणि त्याचे वाटप माननीय वन मंत्री, वन बल प्रमुख, प्रधान सचिव (वने), व्यवस्थापकीय संचालक एफ.डी.सी.एम.लिमिटेड, प्रधान मुख्य वन संरक्षक, सामाजिक वनीकरण, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन्यजीव) यांना देण्याचे ठरले.

**३.३.सेवक संघाच्या कामगिरी बाबत जाहिरात/माहिती तयार करणे**

सेवक संघाने मागील वर्षात आतापर्यंत अनेक कामे हाती घेऊन पूर्ण केली आहेत. या कामाची माहिती/जाहिरात किंवा माहितीपत्राच्या स्वरूपात तयार करून वन विभाग आणि इतर काही शासकीय विभागांना दिल्यास संघाला भविष्यात कामे मिळवण्यास मदत होईल, अशा प्रकारची सूचना सभेत करण्यात आली. सर्वांनी सदर सूचना मान्य केली व त्याप्रमाणे कार्यवाही करण्याची ठरले.

**३.४.नागपूर येथील सेवक संघाच्या कार्यकारिणीचे बळकटीकरण**

नागपूर येथे वन विभाग तसेच एफ.डी.सी.एम.लिमिटेड यांचे मुख्यालय असून तेथील अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्कात राहिल्यास सेवक संघास विविध प्रकारची कामे मिळवता येतील असे सर्व सदस्यांनी मत प्रदर्शित केले. तथापि सेवक संघाची नागपूर कार्यकारिणीची उदासीनता विचारात घेता तिथे पुनर्गठन आवश्यक आहे. याबाबत लवकरात लवकर कार्यवाही करण्यासाठी नागपूर स्थित सेवानिवृत्त वन कर्मचाऱ्यांनी पुढाकार घ्यावा असे आव्हान करण्यात आले.

**३.५. तांत्रिक बाजू बळकट करणे**

वृक्ष गणनेसारख्या कामाबाबत नगर परिषदा, महानगरपालिका यांच्याकडून निविदा काढल्या जातात. त्यासाठी सॉफ्टवेअरच्या सहाय्याने माहिती संकलन करावी लागते. परंतु असे सॉफ्टवेअर सेवक संघाकडे नसल्याने त्यास अशा निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेता येत नाही. तरी याबाबत जी तांत्रिक दृष्ट्या कमतरता आहे, त्यावर सेवक संघाने उपाययोजना करावी अशी आग्रही मागणी श्री. गवळी यांनी मांडली. अशा काही प्रकारांत फायनान्शिअल निगोशिएशन्स आवश्यक असतात, त्यामुळे सेवक संघाने एखाद्या स्वयंसेवी संस्थेचे सहाय्य घेऊन अशी कामे मिळवण्यासाठी प्रयत्न करावेत अशी सूचना श्री. संजय जगताप यांनी केली.

**४. सेवक संघाची सभासद वार्षिक वर्गणी रुपये २०० वरून कमीत कमी रुपये ५०० आणि आजीवन सभासद शुल्क रुपये २००० वरून ३००० करणेबाबत**

अनेक वर्षापासून सेवक संघाची वार्षिक वर्गणी रुपये २०० आणि आजीवन वर्गणी रुपये २००० आहे . यामध्ये वाढ करण्याबाबत सभेत चर्चा करण्यात आली. वार्षिक वर्गणीची सुविधा बंद करण्यासाठी काहींनी मत मांडले. परंतु काही कनिष्ठ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या आजीवन वर्गणीत वाढ देणे परवडणारे नसल्याने आणि वार्षिक वर्गणीमुळे काही सदस्य सेवक संघाशी काही वर्षे तरी जोडले जोडले जातात, या बाबी विचारात घेऊन सेवक संघाच्या सदस्यत्वाबाबत सध्या प्रचलित दरांमध्ये कोणती वाढ करण्यात येऊ नये असा निर्णय घेण्यात आला.

**५. ७५ वर्षे वरील सभासदांना हजेरीसाठी किंवा सेवक संघाच्या कार्यक्रमास नियंत्रित केल्यास रुपये ५०० प्रवास भत्ता देणे बाबत**

या विषयावरील चर्चेत कोणताही प्रवास भत्ता देण्याची आवश्यकता नाही असे ठरले.

**6. कै. माधव गोगटे स्मृतिदिन कार्यक्रमाचे निमंत्रित व्यक्तीस मानधन रुपये ८००० करणे बाबत**

सध्या कै. माधव गोगटे स्मृती व्याख्यानासाठी बोलविण्यात आलेल्या व्यक्तीस रु. ५००० मानधन आणि वनभवन पुणे येथे जाण्याचा व्यवस्था खर्च सेवक संघामार्फत करण्यात येतो. सदर कार्यक्रमामागील भावना विचारात घेता निमंत्रित व्यक्तीस देण्यात येणाऱ्या मानधनाची मध्ये कोणती वाढ करण्याची आवश्यकता नाही असा निर्णय सर्वांनुमते घेण्यात आला.

**७.चंद्रपूर औरंगाबाद नाशिक शाखा सक्षम करण्यासाठी उपाय योजना**

सेवक संघाच्या चंद्रपूर शाखेचे काम समाधानकारक आहे, परंतु नाशिक व औरंगाबाद शाखेकडून कोणतेही कामात सुधार दाखविला जात नाही असे श्री.पत्की यांनी सांगितले. नाशिक व औरंगाबाद येथील नव्याने सेवानिवृत्त झालेल्या किंवा अद्याप सेवक संघाचे सदस्य न झालेल्या वन कर्मचाऱ्यांची संपर्क साधण्यात यावा आणि तेथील कार्यकारिणीमध्ये अमुलाग्र बदल करण्यात यावा असा निर्णय चर्चेअंती घेण्यात आला. सेवानिवृत्तीनंतर ही वन कर्मचाऱ्यांचे प्रलंबित राहणाऱ्या प्रश्नाबाबत जर सेवक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी लक्ष घालून पाठपुरावा केला तर, सदस्यांच्या संख्येत वाढ होऊ शकते आणि त्यांच्यामध्ये उत्साह निर्माण होतो अशी माहिती धुळे वनवृत्ताचे काही प्रकरणांमध्ये केलेल्या कारवाईची उदाहरणे देऊन श्री गवळी यांनी माहिती दिली.

**८.आयत्या वेळेचे विषय**

**८.१. सेवक संघाच्या मुदत ठेवीबाबत**

श्री संजय जगताप यांनी सेवक संघाच्या मुदत ठेवी म्हणजेच फिक्स डिपॉझिट मधील रकमेचा विनियोग चॅरिटी कामासाठी करण्याबाबत सुचविले. मुदत ठेवीचा उपयोग सदस्यांना आवश्यक कामासाठी होणे बाबत त्यांनी आग्रहाने सांगितले. याबाबत पूर्वीच अनुभव म्हणून त्यांनी सांगितले की पुस्तक छपाईसाठी मागणी करूनही सेवक संघाच्या केंद्रीय कार्यकारिणीने अमरावती शाखेस लागणारी रक्कम मुदत ठेव मोडता येत नसल्याने नाकारली. त्यामुळे सदस्यांना स्वतःची रक्कम जमा करून पुस्तक छापण्याचे काम पूर्ण करावे लागले. यावर या पुढे अशी वेळ येणार नसल्याचे अध्यक्षांनी स्पष्ट केले .

**८.२. रोपवाटिकांचा मूल्यांकन कामाच्या रकमेचे वाटप**

श्री संजय जगताप यांनी रोपवाटिका मूल्यांकन कामाबाबत रुपये ११.५५ लाख रुपये रक्कमेपैकी अंशत: रक्कम मिळाली असल्याची माहिती दिली. तसेच प्रति रोपवाटिका प्रति सदस्य दर रुपये २५०० ऐवजी ३००० अशी मानधनाची वाढही मंजूर झाल्याचे सांगितले. संपूर्ण रक्कम प्राप्त झाल्यावर सुमारे ३५ टक्के रक्कम शिल्लक राहण्याची शक्यता असल्याने सेवक संघाच्या खात्यावर किती रक्कम जमा करावी याबाबत त्यांनी प्रश्न उपस्थित केला. तसेच धुळे वृत्ताची उर्वरित रक्कम पूर्ण जमा झाल्यावर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**८.३. नार-पार प्रकल्प**

सदर प्रकल्पाचे काम एका संस्थेमार्फत सेवक संघास मिळाले असून राज्यातील बदललेली राजकीय परिस्थिती आणि येऊ घातलेल्या लोकसभा निवडणुका यामुळे संबंधित संस्थेकडेच निधी उपलब्ध नसल्याने या कामाची प्रगती नजीकच्या काळात होऊ शकत नसल्याची माहिती श्री.पत्की यांनी दिली.

**८.४. सोलापूर उस्मानाबाद रेल्वे प्रकल्प**

या प्रकल्पास कितपत प्राधान्य आहे याबाबत साशंकता असून रेल्वेच्या सब कमिटीने तयार केलेल्या अहवालावर पुढील निर्णय झालेला नसल्याने या प्रकल्पाबाबत अनिचिश्चतता असल्याचे श्री.पत्की यांनी सांगितले.

**८.५. कन्हारगाव अभयारण्याचा व्यवस्थापन आराखडा**

या प्रकरणी काय प्रगती झाली याबाबत सेवक संघाला वन विभागाकडून काही कळविण्यात आलेले नाही. या क्षेत्रात एफडीसीएम चे काम बंद असून वन्यजीव व्यवस्थापनाचे कामासही सुरुवात झालेली नाही, अशी माहिती काही सदस्यांनी दिली.

**८.६.धुळे शाखेतील महिला सदस्यांचे मनोगत**

धुळे सेवक **शाखेत** दोन महिला वन मजूर सेवानिवृत्त झाल्यावर त्यांना सदस्य बनविण्यात यश आले आहे. श्रीमती सुमनबाई बावा आणि लताबाई पाटील यांनी मनोगत व्यक्त करतांना सांगितले की त्या सेवानिवृत्त झाल्यावर त्यांचे सेवानिवृत्ती प्रकरण आणि जीपीएफ चे प्रलंबित काम मार्गी लावण्यामागे धुळे शाखा संघाच्या सदस्यांनी बहुमोल मदत केली. त्यामुळे त्यांनी सेवक संघाचे सदस्यत्व मिळाले स्वीकारले.

**९. श्री बाळकृष्ण छल्लारे यांचे कीर्तन**

सेवक संघाच्या धुळे शाखेतील आजीवन सदस्य श्री बाळकृष्ण छल्लारे यांनी वन संरक्षण, वन संवर्धन व पर्यावरण रक्षण इत्यादी बाबत बोधपर माहिती देणारे कीर्तन सादर केले. सेवक संघामार्फत मूल्यांकनाचे काम जेथे येथे केले जाते, त्या गावात ते कीर्तनाद्वारे प्रबोधन करतात. या त्यांच्या कीर्तनास जनतेकडून उत्तम प्रसिद्ध मिळतो आणि त्यामुळे सेवक संघासाठी काम करण्यास गावकऱ्यांचे सहकार्य मिळते, अशी माहिती श्री. गवळी यांनी दिली

**श्री. विश्वास सावरकर, अध्यक्ष, सेवक संघ यांचे भाषण**

श्री. विश्वास सावरकर, अध्यक्ष, सेवक संघ, महाराष्ट्र यांनी अध्यक्षीय भाषणात खालील मुद्दे मांडले.

१. सभेमध्ये चर्चा उत्तमरीत्या झाली आणि सदस्यांनी त्यांचे विचार समर्थपणे मांडले.

२. क्षेत्रीय कामे करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याचे कौशल्य सदस्यांनी वाढविणे आवश्यक आहे. ३.सोशल सायन् चे महत्व जाणून त्यामध्ये प्रगती करावी.

४. आपल्या वार्तापत्रामध्ये एखादा लेख ज्वलंत मुद्द्यावरील Scientific opinion बाबत असावा .

सर्व सामान्य कामामध्ये निसर्गाचे महत्त्व त्यातून पटविण्याचा प्रयत्न करावा

५.खोट्या बातम्या प्रसारित होण्याचे प्रमाण पाहता त्या खोडून काढणे आवश्यक आहे.

६. विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना बोलावून त्यांच्याशी इंटरॅक्शन वाढवावी.

मध्यवर्ती सेवक संघ समितीची कार्यकारी सभा संपल्यानंतर श्री जयप्रकाश पाटील सचिव यांनी अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, सर्व उपस्थितांचे] सहभागींचे आभार मांडून सर्वांना धन्यवाद दिले. पुढील वर्षी सभा चंद्रपूर येथे होईल असे ज्येष्ठ सेवक संघ सदस्य श्री. पत्की यांनी सूचित केले.

*******************************************************

## वन प्रशिक्षण अभ्यासक्रम सुधारणा करणे बाबत केलेल्या प्रगतीचा सादरीकरण कार्यक्रम

सेवक संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला संलग्न करून वन प्रशिक्षण अभ्यासक्रम सुधारणा करणे बाबत आतापर्यंत सदस्यांनी केलेल्या प्रगतीचा सादरीकरण कार्यक्रम देखील संलग्न करण्यात आला होता. त्यानुसार दोन दिवसात खालील सदस्यांनी त्यांना वाटप केलेल्या वन प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे पावर पॉइंट द्वारा सादरीकरण केले. सादरीकरण करताना सदस्यांनी अनेक मुद्यांचे स्पष्टीकरण करण्यात आले. सादरीकरणात काही व्याकरण विषयक व तांत्रिक त्रुट्या श्री. पत्की व इतरांनी निदर्शनास आणल्या त्यांची नोंद सादरकर्ते सदस्यांनी घेतली.

श्री. संजय जगताप - वन कायदे

श्री. एस. व्ही. कुंभकर्ण - वनमिती वन सर्वेक्षण, जी आय एस

श्री. जी. एस. खांडेकर - वन्यजीव व्यवस्थापन

श्री. एम. एम. कुलकर्णी - कार्यालयीन प्रक्रिया व लेखा कार्यपद्धती, वन व्यवस्थापन व कार्य आयोजना

श्री. एस. के. गवळी - वनसंवर्धन भाग -१.

श्री. एस एच पाटील - वन वनस्पती शास्त्र व जैवविविधता

श्री पी. के. कुलकर्णी वन अभियांत्रिकी मृदा शास्त्र मृदा व जलसंवर्धन

श्री जयप्रकाश पाटील - वन संरक्षण

असे सूचना श्री. पत्की यांनी सादरीकरण होत असताना अशा सूचना दिल्या चंद्रपूर अकादमीने निश्चित केलेल्या अभ्यासक्रमानुसार सध्या जो अस्तित्वात असलेला अभ्यासक्रम आहे त्यात आवश्यक व योग्य ते फेरबदल करून पाठ्यक्रम सुधारित करण्यात यावा. अभ्यासक्रमाची पुस्तिका तयार करावी व ती चंद्रमा अकादमीला पोस्टाने पाठवावी. तसेच त्याची एक पीडीएफ प्रत समन्वयक व चमू प्रमुख यांना ई-मेलद्वारे पाठवावी

*******************************************************

## *नवी आव्हाने*

.

## अभ्यासक्रम सुधारीत करून वाचन साहित्य निर्माण करणेचे काम

**महाराष्ट्रातील वन प्रशिक्षण संस्थांमधील वनरक्षक व वनपाल जुने अभ्यासक्रमातील १४ विषयांवरील शिक्षण साहित्य सुधारित करणे, अभ्यासक्रम मंजूरी नंतर, सुधारीत अभ्यासक्रम व वाचन साहित्य निर्मित्तीसाठी सहाय्य करणेकामी कार्यरंभ आदेश अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, वन संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण,म.रा. तथा संचालक, चंद्रपूर वन प्रशासन,विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी ,चंद्रपूर यांचेकडून ६ विषयांसाठी प्राप्त झालेत.**

**वानिकी विषयांचे नवनिर्मित वाचन साहित्याचा पहिला मसुदा पाठवून, त्यांनी केलेल्या सूचनांचा विचार करुन अंतिम मसुदा त्यांना सादर करणे.**

**प्रशिक्षण साहित्य तयार करण्याचे काम देणेत आले होते त्या संदर्भात खालील सदस्यांनी सादरीकरण केले.**

१.वन संवर्धन शास्त्र भाग- १ - श्री. एस.के.गवळी
२. वन संवर्धन शास्त्र भाग- ३- श्री. एस. के. गवळी
३. वन संरक्षण- श्री. जे. ए. पाटील
४. वन / वन्यजीव कायदे- श्री. एस. एम. जगताप
५. वन्यजीव व्यवस्थापन, वनपर्यटन- श्री. जी. एस. खांडेकर
६. मृद व जल संधारण - श्री. प्रदिप कुलकर्णी
७. वन अभियांत्रिकी- श्री. प्रदिप कुलकर्णी
८. वन सर्वेक्षण, GIS/GPS -श्री. एस. व्ही. कुंभकर्ण
९. वन मिती - श्री. एस.व्ही. कुंभकर्ण
१०. वन व्यवस्थापन वकार्य आयोजना - श्री. मदन कुलकर्णी
११. वनोपयोगिता- श्री. आर. बी. गिरी
१२. व्यवस्थापकीय कौशल्य विकास- श्री. बी. व्ही. सेलुकर
१३. कार्यालयीन कामकाज पध्दती / लेखा- श्री. मदन कुलकर्णी
१४. जमीन अभिलेख - व्ही. बी. सूर्यवंशी/ विकास जगताप
१५. जैवविविधता व्यवस्थापन - श्री.डॉ.एस.एच.पाटील
१६. वन वनस्पतिशास्त्र - श्री.डॉ.एस.एच.पाटील
१७. मृदाशास्त्र - श्री. प्रदिप कुलकर्णी

### प्रासंगिक...



**गुजराती महिला वन अधिकाऱ्याचा उत्कृष्ट वन्यजीव संवर्धन कार्यासाठी सेवक संघ, महाराष्ट्रतर्फे गौरव**

**सेवानिवृत्त वन कर्मचारी (सेवक) संघ, महाराष्ट्र, पुणे ही २७ वर्षांपूर्वी स्थापन झालेली समर्पित सेवानिवृत्त वन कर्मचाऱ्यांची स्वयंसेवी संस्था असून ती वन, वन्यजीव संवर्धन,आणि पर्यावरण क्षेत्रात सतत कार्यरत आहे. सेवक संघ, यांची महाराष्ट्र राज्यातील वन विभागातील सर्वोत्कृष्ट क्षेत्रीय कर्मचाऱ्यांचा-राष्ट्रभक्तांचा शोध घेऊन त्यांचा सत्कार करण्याची आणि त्यांचे उत्कृष्ट कामाचे योगदान सार्वजनिक क्षेत्रात आदर्श म्हणून आणण्याची परंपरा आहे.**

**या वर्षी सेवक संघाने राज्याबाहेर आपला दृष्टीक्षेप टाकला आहे आणि श्रीमती रसीलाबेन वाढेर या लक्षात आल्या. आता हे कळवण्यास अत्यंत आनंद होतो की, श्रीमती रसीलाबेन वाढेर, रेंज फॉरेस्ट ऑफिसर, वेरावळ, सामाजिक वनीकरण विभाग, सोमनाथ गिर विभाग, यांना ११०० हून अधिक वन्यजीव**

बचाव कार्यात, ज्यामध्ये २५० हून अधिक सिंह, ५५० बिबटे आणि मगर, अजगर, साप यांसारखे इतर वन्य प्राणी जे चुकून शहराच्या परिसरात/ गावात/ शेतीच्या परिसरात घुसले, विहिरीत पडले किंवा अडकले होते ,त्या प्राण्यांची सुटका करून जंगलात सोडले. विशेषतः सासन गिर राष्ट्रीय उद्यान आणि अभयारण्याच्या लगतअसलेल्या गावांमध्ये मानव-वन्यजीव संघर्षाच्या अनेक घटना तिने आश्चर्यकारकपणे आणि धैर्याने सोडवल्या आहेत. रसीलाबेन वाढेर यांच्या केलेल्या उत्कृष्ट आणि अवाढव्य कार्याबद्दल नुकतेच धुळे येथे सन्मानित करण्यात आले. रसीलाबेन यांनी आशिया खंडातील सिंहांचे एकमेव आश्रयस्थान असलेल्या सासन गीर नॅशनल पार्क आणि वन्यजीव अभयारण्यात वन्य प्राण्यांपासून जीवाला हल्ल्याचा धोका, झुनोटिक रोगाची ती , प्रतिकूल हवामान आणि सतत दिवसा रात्र संरक्षणासाठी धावपळ, यासह पुरूष सदस्यांमधील विवाहित महिला कर्मचारी सदस्यांसाठी रात्रीची गस्त आणि इतर अनेकविपरीत गोष्टी असूनही शौर्य आणि निष्ठेने पूरक उपक्रम राबवले, जसे कर्मचारी प्रशिक्षण, वन्य प्राण्यांचे पुनर्वसन व्यवस्थापन वगैरे. श्रीमती रशिलाबेन वाढेर यांच्या तोंडून त्यांनी केलेल्या कामाची माहिती ऐकणे एक रोमांचक अनुभव आहे व एक महिला वन कर्मचारी किती उत्कृष्टपणे काम करू शकते याची अद्भुत अनुभूती मिळते. वन्यप्राणी बचाव कामात त्यांनी दाखवलेली धाडसी वृत्ती , कर्तव्य परायणता, सेवाभाव, निष्ठा यामुळे वनपाल श्रीमती रशिलाबेन यांना अनेक बक्षिसे मिळाली आहेत, सत्कार झाले आहेत.

दि. २८ जानेवारी २०२४ रोजी सेवक संघाचे २८ स्थापना दिनी आणि धुळे येथे झालेल्या सन २०२२-२३च्या सर्व साधारण सभेत रसीलाबेन यांना श्री. ऋषिकेश रंजन, मुख्य वनसंरक्षक, नाशिक वन वृत्त, श्री. विश्वास सावरकर, माजी संचालक, भारतीय वन्यजीव संस्था, देहरादून आणि सध्या राष्ट्रीय वन्यजीव मंडळाचे सदस्य आणि सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र, पुणेचे सांप्रत अध्यक्ष यांच्या हस्ते सन्मान पत्र देऊन गौरवित करण्यात आले. श्रीं एस.के. गवळी, सेवक संघ महाराष्ट्रचे उपाध्यक्ष यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम धुळे येथे झाला. त्या कामी संघाचे कार्यकारी अध्यक्ष श्री. मदन कुलकर्णी, डॉ. एस.एच. पाटील,विठ्ठल पत्की, विश्वस्त वइतर मान्यवर सदस्यांच्या सहकार्य व पाठबळ मिळाले .

रसीलाबेन यांना यापूर्वी माननीय श्री. नरेंद्र, मोदीजी आणि आनंदीबेन पटेल यांचेकडूनही यापूर्वी सन्मानित केले गेले होते. अलीकडेच प्रजासत्ताक दिनी,२६ जानेवारी २०२४ रोजी मा. राष्ट्रपतींकडून दिल्ली येथे राष्ट्रपतींभवनात कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. गुजरातमधील वन्यजीव बचाव पथकातील प्रथम महिला अधिकारी म्हणून रसिलाबेन यांना बहाल करण्यात आलेले आहेत. 'वन्य जीवन सेवा पुरस्कार', 'सिंह राणी रत्न पुरस्कार'', 'हीरा मानेक पुरस्कार' मुख्य आहेत. 'नारी गौरव पुरस्कार' व गुजरातच्या मुख्यमंत्र्यांकडून मिळाला होता. तिच्या कार्याचे गुजरात आणि भारतातील लोक कौतुक करतात. तिच्या कार्याची नोंद आंतरराष्ट्रीय बातमीपत्र "द टाइम्स" आणि इतरांनी घेतली आहे. त्यांच्यावर केंद्रीत 'द लायन क्वीन्स ऑफ इंडिया' हा प्रसिद्ध माहितीपटही डिस्कव्हरी चॅनेलवर नियमितपणे दाखवला जातो. याआधीही २०२ मध्ये रोझ नेटवेस्ट ग्रुपतर्फे पृथ्वी नायक "सेव्ह द स्पीसीज" पुरस्कारासाठी गौरविण्यात आले होते. डिस्कव्हरी वाहिनीद्वारे प्रसारित होणाऱ्या "द लायन क्वीन ऑफ इंडिया" मध्ये तिने वैशिष्ट्यीकृत केले आहे. १९८५ मध्ये जुनागढ जिल्ह्यात जन्मलेल्या गुजरातमधील त्या पहिल्या महिला वनरक्षक आहेत, ज्या देशातील अनेकांसाठी प्रेरणादायी आदर्श ठरल्या आहेत व इतर अनेक महिला कर्मचारी सदस्यांसाठी प्रेरणादायी बनल्या आहे.

### 🌻 *नवी आव्हाने*

## अभ्यासक्रम सुधारीत करून वाचन साहित्य निर्माण करणे हे काम

अप्रमुवसं, संशिप्र म.रा. तथ संचालक, चंद्रमा, चंद्रपूर यानी महाराष्ट्रातील वन प्रशिक्षण संस्थांमधील वनरक्षक व वनपाल जुने अभ्यासक्रमातील १४ विषयांवरील शिक्षण साहित्य सुधारित करणे व अद्यावत (सद्यस्थिती नुसार) असणे आवश्यक आहे असे सेवक संघास कळवून याकरिता स्वारस्य अभिरूची बाबत विचारणा केली आहे. त्याचे स्वागत करून विषय वार तज्ञ व्यक्तींचे चमू तयार करणे व इतर अनुषंगिक बाबीवर जसे कार्य कालावधी, शुल्क आणि प्रक्रीया चर्चा ५ सप्टें.च्या केंद्रीय कार्यकारिणीच्या मासिक सभेत झाली वन रक्षकांचे २४ आठवड्याचे प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्यातील वन विभागास, अभ्यासक्रम मंजूरी नंतर, सुधारीत वाचन साहित्य निर्मित्तीसाठी सहाय्य करणेकामी स्वारस्य इरादा प्रस्ताव (Expression of Interest) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक, वन संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण,म.रा. तथा संचालक, यांना जेणे करून वाहन व्यवस्था करणे सुकर होईल.

## आजीवन सदस्य

श्री मनोहर आनंदा सैंदाणे सेवानिवृत्त विभागीय वन अधिकारी सध्या निवासी पुणेकर यांनी वार्षिक वर्गणी रुपये 210 ऑनलाइन पद्धतीने सेवक संघ धुळे शाखेच्या अकाउंट मध्ये जमा केली आहे. त्यांना धुळे शाखेच्या

सेवक संघात साधारण सदस्य म्हणून स्वीकृत करण्यात येत आहे. श्री सैंदाणे साहेब याचे सेवक संघ परिवारात स्वागत.

वेधक वृत्त




दिनांक ७ फेब्रुवारी रोजी धुळे जिल्हा सिविल सर्जन डॉक्टर दत्ता देगावकर यांना सेवक संघाने प्रसिद्ध केलेल्या येथील रानभाज्या माहिती पुस्तकाची प्रत भेट म्हणून दिली त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले व बारी पाडा येथे भेट देण्याचा संकल्प जाहीर केला.




फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र लिमिटेड नागपूर यांनी सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ महाराष्ट्र यास एफडीसीएमची ५० वर्ष पूर्ण झाल्या प्रसंगी स्मरणिका छपाईच्या कामाची जबाबदारी दिली होती व त्या शंभर पृष्ठाच्या स्मरणिकेच्या १००० प्रति साठी १६१२८० रुपये मंजूर केले होते. सदरचे स्मरणिका छपाईचे काम श्री व्ही. टी. पत्की सर यांनी यशस्वीपणे करून सदर स्मरणिकेच्या सर्व प्रति फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र यांना सुपूर्द केल्या आहेत. या कामात द्वारे सेवक संघाच्या शिरपेचात एक वेगळा मानाचा तुरा प्राप्त झाला आहे. श्री. पत्की सरांचे त्याबद्दल आभार व हार्दिक अभिनंदन. सदर स्मरणिकेत ज्यांचे लेख प्रसिद्ध करण्यात आले आहेत, त्यांना पोस्टाने त्याची एक प्रत लवकरच पाठविण्यात येणार आहे, असे समजते



श्री नितीन कुमार सिंग, उप वन संरक्षक धुळे विभाग यांना सेवक संघ अमरावती शाखेने तयार केलेली सन 2024 ची बांबू युक्त दिनदर्शिका भेट दिली



अमरावती शाखेच्या वतीने बांबू पासून तयार करण्यात आलेली सन २०२४ची दिनदर्शिका श्री सानप, विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण विभाग धुळे यांना भेट दिली.

केवळ खाजगी वितरणासाठी

प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे

संपादन - एस. के. गवळी